फिर्यादी 20...

N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

पोलीस स्टेशन MIDC वाळूज छत्रपती संभाजीनगर (शहर)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)

प्रथम खबर अहवाल

(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** छत्रपती संभाजीनगर शहर **P.S.(ठाणे):** एम.आई.डी.सी. वाळूंज

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0811 **Year (वर्ष):** 2026

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 19/08/2026 23:29

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** बुधवार **Date From (दिनांक पासून):** 19/08/2026

**Time Period (कालावधी):** पहर 6 **Date To ( दिनांक पर्यंत):** 19/08/2026

**Time From (वेळेपासून):** 16:00 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 16:00 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 19/08/2026 **Time (वेळ):** 23:12 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 064

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 19/08/2026 23:12 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

उत्तर, 2 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** वंदना कम्युनिकेशन बजाजनगर,MIDC वाळुज

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** राजु भाऊलाल नांगलोत

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1983

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,छत्रपती संभाजीनगर,एम.आई.डी.सी. वाळूज, छत्रपती संभाजीनगर शहर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,छत्रपती संभाजीनगर,एम.आई.डी.सी. वाळूज, छत्रपती संभाजीनगर शहर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-7720872555

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | लक्ष्मण हिराजी धडेकर | | | 1. गट नं 86 प्लट नं 67 न्यु, सलामपुरेनगर, वडगाव हस्पिटल,जवळ वडगाव कोल्हाटी,छत्रपती संभाजीनगर , एम.आई.डी.सी. वाळूंज,छत्रपती संभाजीनगर शहर,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| **S.No.** (अ.क्र.) | **Property Category** (मालमत्ता वर्ग) | **Property Type** (मालमत्ता प्रकार) | **Description** (वर्णन) | **Value(In Rs/-)** (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 100/ रुपये दराच्या 03 भारतीय चलनी नोटा, 50/ रुपये दराची 01 भारतीय चलनी नोट | 350.00 |

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

350.00

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| **S.No.** (अ.क्र.) | **UIDB Number** (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद दि. 19/08/2026

मी राजु भाऊलाल नांगलोत, वय 43 वर्षे, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, छत्रपती संभाजीनगर मो नं. 7720872555
मी दिनांक 18/08/2026 रोजी ला.प्र.वि. कार्यालय, छत्रपती संभाजीनगर कार्यालयात हजर असताना, मला मा. पोलीस अधीक्षक ला.प्र.वि. छत्रपती संभाजीनगर यांनी त्यांचे कक्षात बोलावुन घेवुन तक्रारदार श्रीमती शीतल काकडे यांची भेट घालुन देऊन सांगितले की, तक्रारदार यांच्या तक्रारीच्या अनुषंगाने योग्य ती कायदेशिर कारवाई करा. तेव्हा आम्ही तक्रारदार यांना विचारपुस केली असता त्यांनी सांगितले की, तुम्ही उदया दिनांक 19/08/2026 रोजी मी तुम्हाला फोन करते तेव्हा तुम्ही बजाजनगर येथे या मी तुमच्याकडे लेखी तक्रार लिहुन देते असे सांगितले. त्यावरुन आज दिनांक 19/08/2026 रोजी आम्ही पत्र देऊन दोन शासकीय पंचाची सेवा उपलब्ध करुन घेतली. त्यानंतर सापळा पथकासह कारवाई करण्यासाठी बजाजनगर येथील सुरक्षित ठिकाणी येऊन तक्रारदार श्रीमती शीतल काकडे यांना त्यांचे मोबाईल फोनवर संपर्क साधुन त्यांना सुरक्षित ठिकाणी बोलावले. तेव्हा आम्ही तक्रारदार व पंच तसेच आमचा आपसात परिचय करुन दिला. आम्ही पंचासमक्ष श्रीमती शीतल काकडे यांना त्यांची तक्रार विचारली असता त्यांनी त्यांचे नाव श्रीमती शीतल शांताराम काकडे, वय-27 वर्षे व्यवसाय- मार्केटिंग, रा.बजाजनगर ता. जि. छत्रपती संभाजीनगर.असे सांगुन तक्रार दिली ती खालील प्रमाणे.
मी वरील प्रमाणे असुन मी मार्केटिंग करुन उदरनिर्वाह करते. मला बचत गटाच्या व बँकेच्या कामासाठी 100/- रुपये दराचे 03 बॉंडपेपर ची आवश्यकता असल्यामुळे मी दिनांक 18/08/2026 रोजी वंदना कम्युनिकेशन स्टँप व्हेंडर विक्रेता,बजाजनगर MIDC छत्रपती संभाजीनगर येथील स्टँप विक्रेता श्री. धडेकर यांचेकडे 100/- रुपये दराचे 03 बॉंडपेपर मागितले असता, त्यांनी 03 बॉंडपेपरचे 360/- रुपये मागितले तेव्हा मी त्यांना म्हणाले की, तुम्ही 60/- रुपये जास्त का घेत आहात तेव्हा श्री. धडेकर म्हणालेकी, तुम्हाला बॉंडपेपर घ्यायचे असेल तर घ्या नाहीतर नका घेऊ असे म्हणाल्याने मी घरी परत आले. तेव्हा माझे लक्षात आले की, श्री. धडेकर हे प्रत्येक बॉंडपेपर मागे 20/- रुपये प्रमाणे 60/- रुपये अतिरीक्त मागणी करीत असुन मला 60/- रुपये देण्याची इच्छा नाही.
दिनांक 19/08/2026 रोजी मी बजाजनगर येथील बॉंडपेपर विक्रेता श्री. धडेकर यांची भेट घेऊन त्यांचेकडे 100/- रुपये दराचे 03 बॉंडपेपर खरेदी करणार आहे तेव्हा बॉंड विक्रेता श्री. धडेकर हे माझेकडुन 100/- रुपये दराच्या बॉंडपेपरचे 360/- रुपये म्हणजेच 60/- रुपये जास्तीचे घेतील तेव्हा त्यांचेवर योग्य ती कारवाई करावी. " वगैरे लेखी तक्रार दिली. सदर तक्रारीवर आम्ही पंचानी सह्या केल्या.
त्यानंतर तक्रारदार यांनी अधिकृत बॉंड विक्रेता श्री. धडेकर यांचे बजाजनगर, MIDC वाळुज येथील वंदना कम्युनिकेशन स्टँप पेपर विक्रेता येथे बॉंड खरेदी करण्यासाठी जाऊन चर्चा करणार असल्याचे सांगीतले.
तक्रारीचे अनुषंगाने तक्रारदार श्रीमती शीतल काकडे व पंच क्रं.1 यांचेसह इलोसे श्री.धडेकर यांची बजाजनगर, MIDC वाळुज या ठिकाणी पाठवुन इलोसे श्री. धडेकर हे शासकीय रकमेच्या व्यतिरीक्त जास्त पैसे घेऊन लाचमागणी करतात अगर कसे ? याची आपण प्रथम लाचमागणी पडताळणी करणार आहोत असे सांगितले.

त्यानंतर आम्ही तक्रारदार, पंच व सापळा पथकास पडताळणी कारवाईचे अनुषंगाने संपुर्ण सुचना दिल्या. तसेच शासकीय डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर काढुन त्यामध्ये SanDisk कंपनीचे 16 जीबी क्षमतेचे नवीन मेमरी कार्ड पंचांचे समक्ष घालुन, त्यामध्ये यापुर्वीचे कोणतेही ध्वनीमुद्रीत संभाषण नसलेची तक्रारदार व पंचांची खात्री करुन दिली. त्यानंतर पडताळणी कारवाईचे अनुषंगाने व्हाईस रेकॉर्डर 14.25 वा.चालु करुन, तक्रारदार श्रीमती शीतल काकडे यांचेकडे दिला तो त्यांनी स्वत: त्यांचे गळयात दोऱ्याचे सहाय्याने अडकवुन घेतला. तक्रारदार व पंच नं. 01 यांना श्री. धडेकर यांचे बजाजनगर, MIDC वाळुज येथील वंदना कम्युनिकेशन या ठिकाणी त्यांची भेट घेण्याकरीता खासगी वाहनाने पाठविले. त्यानंतर तक्रारदार व पंच क्रं 1 असे इलोसे श्री.धडेकर यांची बजाजनगर, MIDC येथील वंदना कम्युनिकेशन बाँड खरेदी संदर्भात भेट घेवुन आम्ही थांबलेल्या सुरक्षीत ठिकाणी परत आले. त्यानंतर तक्रारदार यांचे गळयातील व्हाईस रेकॉर्डर काढुन 15.14 वाजता बंद केला.
त्यानंतर आम्ही पंच क्रं. 1 यांना इलोसे श्री.धडेकर यांना भेटण्यास गेल्यानंतर तेथे काय घडले याबाबत विचारले असता त्यांनी सांगीतले की, मी व तक्रारदार श्रीमती शीतल काकडे असे सोबत निघुन इलोसे श्री. धडेकर यांचे वंदना कम्युनिकेशन बजाजनगर, MIDC, वाळुज येथे जाऊन तक्रारदार यांनी इलोसे श्री. धडेकर यांना 100/- रुपये दराचे 03 बाँडपेपर मागितले तेव्हा श्री. धडेकर यांनी तक्रारदार यांना त्यांचे नाव आधार कार्ड नंबर व मोबाईल नंबर विचारुन श्री. धडेकर यांनी तक्रारदार यांना 100/- रुपये दराचे 03 बाँडपेपर दिले तेव्हा तक्रारदार यांनी सांगितले की, किती झाले तेव्हा श्री. धडेकर म्हणाले की, साडे तिनशे दया, तिनशे साठ होतात तेव्हा तक्रारदार म्हणाल्या की, साडे तीनशे का ? ऑनलाईन करु का, तेव्हा श्री. धडेकर म्हणाले की, ऑनलाईन नाही काढुन घेऊन या. तुमच्या कडे राहु दया, तिनशे साठ होतात तुम्ही कॅश आणुन दया तेव्हा तक्रारदार म्हणाल्या की, तुमचेकडे राहू दया तेव्हा श्री. धडेकर म्हणाले की, नही नही तुम्ही घेऊन जा, पैसे आणुन दया, सोबत घेऊन जा, बाँड तुम्हाला काम असल तर करुन घ्या, तेव्हा तक्रारदार म्हणाले की, साडे तिनशे आणुन देऊ का, तेव्हा श्री.धडेकर म्हणाले की, हो, एक तास लागला तरी लागु दया, काही अडचण नाही असे म्हणुन श्री. धडेकर यांनी तक्रारदार यांना 100/- रुपये दराचे 03 बाँडपेपर देऊन शासकीय रक्कम 300/- रुपये एवजी 350/- रुपये मागितले असल्याचे सांगितले.
त्यानंतर आम्ही तक्रारदार श्रीमती शीतल काकडे यांच्याकडे घडलेल्या घटनेबाबत चौकशी केली असता त्यांनी देखील पंच क्रं. 1 यांचे प्रमाणे हकीकत सांगीतली. त्यानंतर आम्ही व्हाईस रेकॉडर चालु करुन त्यामधील तक्रारदार आणि इलोसे श्री. धडेकर यांचेत लाचमागणी पडताळणी दरम्यान झालेले संभाषण ऐकले असता तक्रारदार यांना इलोसे श्री. धडेकर यांनी 100/-रुपये दराचे 03 बाँडपेपरचे 300/-रुपये ऐवजी 350/- रुपये मागतिल्याचे निष्पन्न झाले आहे.
इलोसे श्री.धडेकर यांनी 100/-रुपये दराचे 03 बाँडपेपरचे शासकीय रक्कम 300/-रुपये ऐवजी 350/-रुपये म्हणजेच 50/-रुपये अतिरीक्त रक्कम मागतिल्याचे निष्पन्न झाल्याने तक्रारदार यांना इलोसे श्री.धडेकर यांना 350/- रुपये देऊन सापळा कारवाई करण्याचा सर्वानुमते निर्णय घेण्यात आला.
त्यानंतर तक्रारदार श्रीमती शीतल काकडे यांना लाच रक्कम बाबत विचारणा केली, त्यावेळी त्यांनी त्यांचेकडील 100/- रुपये दराच्या 03 भारतीय चलनी नोटा, 50/- रुपये दराची 01 भारतीय चलनी नोट असे एकुण 350/- रुपये रक्कम उपलब्ध केली. त्यानंतर आम्ही तक्रारदार श्रीमती शीतल काकडे व पंचांना अँथ्रासिन पावडरचे गुणधर्म समजावुन, अल्ट्रा व्हायलेट दिव्याचे प्रकाशात हिरवट रंगाची चकाकी असलेबाबत खात्री करुन दिली. त्यानंतर सापळा कारवाईचे अनुषंगाने सापळापुर्व संपुर्ण कार्यवाही केलेनंतर अँथ्रासिन पावडर लावलेले 350/- रुपये तक्रारदार श्रीमती शीतल काकडे यांचे स्वेटरचे ( हुडीचे ) उजवे बाजुचे खिशात ठेवले. त्यानंतर तक्रारदार, दोन्ही पंच व सापळा पथकास सापळा कारवाईचे अनुषंगाने सुचना देवुन, तक्रारदार यास इलोसे श्री. धडेकर यांनी लाच रक्कम स्विकारल्यानंतर त्यांनी त्यांचेकडील डोळ्यावरील चष्मा काढण्याबाबत इशारा करण्याची सुचना दिली. त्यानंतर पंचांसमक्ष पुन्हा सापळा कारवाईचे अनुषंगाने व्हाईस रेकॉर्डर मध्ये SanDisk कंपनीचे 32 जीबी क्षमतेचे नवीन मेमरी कार्ड घालुन 15.53 वा चालु करुन तो तक्रारदार श्रीमती शीतल काकडे यांचेकडे देण्यात आला तो त्यांनी कोणास दिसणार नाही अशा रितीने गळयात अडकवुन ठेवला. तक्रारदार व पंच क्रं 1 यांना सापळा कारवाई साठी खासगी वाहनाने श्री. धडेकर यांची भेट घेण्यासाठी रवाना केले. त्यांचे पाठोपाठ आम्ही सोबत पंच क्रं. 2 व सापळा पथक असे खाजगी वाहनाने तक्रारदार यांच्या पाठोपाठ सुरक्षित अंतरावर वंदना कम्युनिकेशन, बजाजनगर येथील आडोशाला जावुन तक्रारदार नजरेत राहील अशा रितीने थांबलो. तेव्हा तक्रारदार यांनी त्यांचा डोळ्याचा चष्मा काढुन लाच स्विकृतीचा 16.00 वा. पुर्व नियोजीत ईशारा केला. तेव्हा सापळा पथक सक्रीय होऊन लागलीच तक्रारदार व पंच क्र. 01 यांचे जवळ आलो तेव्हा तक्रारदाराचे गळयातील व्हाईस रेकॉर्डर बंद करण्यात आला.
त्यानंतर आम्ही सर्व सापळा पथक, तक्रारदार व पंच क्रं. 2 यांचेसमक्ष पंच क्रं.1 यास सुरक्षीत ठिकाणावरुन निघाल्यापासुन ते नियोजीत इशारा होईपर्यंत काय घडले याबाबत विचारले असता, पंच क्रं.1 याने सांगीतले की, "

मी व तक्रारदार असे श्री. धडेकर यांना भेटण्यासाठी गेलो असता, तक्रारदार श्री. धडेकर यांना म्हणाले की, एक बाँड किती ला धडेकर काका तेव्हा श्री. धडेकर म्हणाले की, एकशे वीसला तेव्हा तक्रारदार म्हणाल्या की, एका बाँडचे शंभर झाले ना.. तिनचे तिनशे होते ना, मी तीन नेले होते ना. तेव्हा श्री. धडेकर म्हणाले की, एकशे वीस तेव्हा तक्रारदार म्हणाल्या की, घ्या जाऊ दया. असे म्हणुन श्री. धडेकर यांनी तक्रारदार यांचेकडुन 350/- रुपये स्विकारले. त्यानंतर आपण आपण श्री. धडेकर यांना ताब्यात घेतले. असे सांगितले. त्यानंतर आम्ही तक्रारदार यांना विचारपुस केली असता त्यांनी पंच क्र. 1 यांचे प्रमाणेच हकीगत सांगितली. त्यानंतर आम्ही पंचासमक्ष इलोसे यांचे नाव पत्ता विचारले असता त्यांनी त्यांचे नाव श्री. लक्ष्मण हिराजी धडेकर, वय 54 वर्षे, व्यवसाय -अधिकृत स्टॅम्प विक्रते, रा. गट नं. 86 प्लॉट नं. 67 न्यु. सलामपुरेनगर, वडगाव हॉस्पिटल जवळ वडगाव कोल्हाटी ता. जि. छत्रपती संभाजीनगर असे असल्याचे सांगीतले. तेव्हा आम्ही त्यांना आमची ओळख करुन देवुन लाचेची रककम कोठे ठेवली याबाबत विचारले असता त्यांनी स्विकारलेली लाचेची रक्कम 350/- रु. हजर केली सदरची लाचेची रक्कम पंच क्रं. 2 यांचे मार्फतीने ताब्यात घेवुन सापळा पुर्व कारवाईवेळी तक्रारदार याने दिलेल्या नोटांशी खात्री करता एकच असल्याचे दिसुन आले. इलोसे श्री. लक्ष्मण धडेकर यांना ताब्यात घेवुन त्यानंतर पुढील कारवाई कामी ला.प्र.वि. कार्यालय छत्रपती संभाजीनगर येथे येवुन पंचनामा करुन कारवाई पुर्ण केली आहे.

तरी दि. 19/08/2026 रोजी 16.00 वाजता वंदना कम्युनिकेशन बजाजनगर, MIDC वाळुज येथे इलोसे श्री. लक्ष्मण हिराजी धडेकर, वय 54 वर्षे, व्यवसाय -अधिकृत स्टॅम्प विक्रते, रा. गट नं. 86 प्लॉट नं. 67 न्यु. सलामपुरेनगर, वडगाव हॉस्पिटल जवळ वडगाव कोल्हाटी ता. जि. छत्रपती संभाजीनगर यांनी मुळ तक्रारदार श्रीमती शीतल शांताराम काकडे, वय-27 वर्षे व्यवसाय- मार्केटिंग, रा.बजाजनगर ता. जि. छत्रपती संभाजीनगर यांना 100/- रुपये दराचे 03 बाँडपेपर खरेदी करण्यासाठी 300/- रुपये ऐवजी 360/- रुपये अतिरीक्त मागणी करुन तडजोडी अंती 350/- रुपये लाच स्विकारली आहे. म्हणुन इलोसे श्री. लक्ष्मण धडेकर यांचे विरुध्द माझी भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम सन 1988 चे कलम 7 प्रमाणे सरकार तर्फे कायदेशिर फिर्याद आहे.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

Rameshwar Mohanlal Gade(I (Inspector)) / pi **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)**

(4) **Transferred to P.S.**
**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (जिल्हा):**

**on point of jurisdiction (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .**

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.(आर. ओ .ए .सी.)**

**Registered by (नोंदणी अधिकारी)**

**Signature of Officer in charge, Police Station**
**(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)**

**Name (नाव):** Rameshwar Mohanla
**Rank(पद):** I (Inspector)
**No.(सं.):** pi

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):**

15. **Date and time of dispatch to the court**
**(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**

विष्णु टी. मुळे
पो.ह.११९३ पो.स्टे. MIDC, वाळुज
छत्रपती संभाजीनगर (शहर)